स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड

संशोधकाचे नांव : जाधव विश्वजीत हणमंतराव

शिक्षण : एम.ए., बी.एड, सेट (राज्यशास्त्र)

ई-मेल : vishvjeet.jadhav३@gmail.com

भ्रमणध्वनी : ९७३०३०८८६०

प्रवर्ग : खुला (ई.डब्लु.एस.)

विषय : राज्यशास्त्र

संशोधनाचा विषय : "अटल बिहारी वाजपेयी यांचे भारताच्या परराष्ट्र धोरणातील योगदान : एक चिकित्सक अभ्यास"

अभ्यासकेंद्र : पीपल्स कॉलेज, नांदेड.

मार्गदर्शक

डॉ.पी.डी.सुर्यवंशी
प्राध्यापक,राज्यशास्त्र विभागप्रमुख
स्वा.सै.सूर्यभानजी पवार महाविद्यालय
पुर्णा (जं.), जि.परभणी
मो.८४२१९९१८९१
Email-prabhakarsir३@gmail.com

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

“अटल बिहारी वाजपेयी यांचे भारताच्या परराष्ट्र धोरणातील योगदान : एक चिकित्सक अभ्यास”

मानवविज्ञान विद्या शाखेअंतर्गत राज्यशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती (Ph.D) पदवीसाठी सादर करावयाच्या शोध प्रबंधाचा प्रारंभीक आराखडा

संशोधक

जाधव विश्वजीत हणमंतराव

एम. ए., बी.एड,सेट (राज्यशास्त्र)

: मार्गदर्शक :

डॉ. पी.डी. सुर्यवंशी

प्राध्यापक,राज्यशास्त्र विभागप्रमुख

स्वा.सै.सूर्यभानजी पवार महाविद्यालय

पुर्णा (जं.), जि. परभणी

: अभ्यासकेंद्र :

पीपल्स कॉलेज, नांदेड

सप्टेंबर २०२२

प्रस्तावना :

अटल बिहारी यांच्या अध्यक्षतेखाली ६ एप्रील १९८० मध्ये भारतीय जनता पक्षाची स्थापना दिल्ली या ठिकाणी झाली. कारण त्या काळात जनसंघ हा पक्ष जनतापक्षात विलिन झ ाला. जनतापक्षाचे सदस्य असणारे आणि ते जनसंघाचे अनेक सदस्य राष्ट्रीय स्वंयसेवक संघाचे सदस्य होते. अशाप्रकारामुळे दुहेरी सदस्यत्व नको म्हणनारा वाद पुढे आला. आणि हा वाद जनता पक्षात निर्माण झाला. त्यामुळे जनता पक्षात सदस्यत्व असणारे यामध्ये विभाजन झ ाले. आणि जनसंघाचे सदस्य पक्षाबाहेर पडले. या परिस्थीतीचे विवेचन करत असतानात मित्र पक्षाच्या साह्याने अटल बिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली या पक्षाने केंद्रात सत्ता स्थापन केली. परंतु त्या काळात अटल बिहारी वाजपेयी यांचे सरकार फक्त १३ दिवस टिकले. या काळात वाजयेयीना बहुमत सिद्ध करता आले नाही त्यानंतर त्यांनी विरोधी पक्ष नेते म्हणुन महत्वाची भुमिका बजावली. पुन्हा त्यानंतर १९९८ च्या काळामध्ये बाराव्या लोकसंख्या निवडणुकीत १७९ जागा प्राप्त केले हे सर्व मा. अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाने केंद्रात मित्रपक्षाच्या सहहार्याने भाजपची सत्ता स्थापन झाली.हे सरकार फक्त १३ महीणे प्राप्त झाले कारण १९९९ ला पुन्हा अटल बिहारी वाजपेयी यांनी या सार्वत्रिक निवडणुकीत १८२ जागा प्राप्त करुन मित्रपक्षाच्या साह्याने पंतप्रधान झाले. या काळामध्ये भारतीय जनता पक्षाने ५ वर्षे सत्ता उपभोगले अशाप्रकारे अटल बहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाने विरोधी पक्ष व पंतप्रधान म्हणुन प्रभावी भुमिका बजावली आहे त्यानंतर २००४ च्या निवडणुकीत १३८ जागा मिळाल्या त्यामुळे त्याकाळात विरोधीपक्ष म्हणुन प्रभावी कार्य केलेले आहे. केवळ अटल बिहारी वाजयेपी मुळेच भारतातील एक मोठा पक्ष म्हणुन भाजपचे अस्तित्व नाकारता येत नाही. अशा

छोट्या पक्षाने बलाढ्य काँग्रेस पक्षाला पर्याय ठरला ही भारतातील लोकशाहीची प्रगल्भता समजावी.

अटल बिहारी वाजपेयी यांचे जिवन परिचय

अटल बिहारी वाजपेयी यांचा जन्म २५ डिसेंबर १९२४ रोजी झाला. ते उत्कृष्ट लेखक व कवी होते ते १९९१ ते २००९ या काळामध्ये भारतीय जनता पक्षाचे लखनो येथे खासदार होते. केवळ १३ दिवस टिकलेल्या ११ व्या लोकसभेत तसेच त्यानंतर १२ व्या लोकसभेत १९ मार्च १९९८ ते १९ मे २००४ या काळात भारताचे पंतप्रधान म्हणुन महत्वाची भुमिका बजावली पंडित जवाहरलाल नेहरु नंतर दोनदा पंतप्रधान होणारे हे पहिले पंतप्रधान म्हणुन ओळखले जाते. अशा या महामानवानी स्वातंत्र्यानंतर भारताचे अंतर्गत व परकीय धोरणास आकार देणारे एक पंतप्रधान परराष्ट्र मंत्री, अशाप्रकारे राष्ट्रीय लोकशाही आघाडीतील महत्वाचा घटक असलेला भारतीय जनता पक्ष हा अगोदर जनसंघ म्हणुन ओळखला जात होता. त्यांना सर्वोच्च नागरी पुरस्कार भारतरत्न २०१४ साली बहाल केला ˛अशा या महामानवाचा मृत्यु १६ ऑगस्ट २०१८ मध्ये झाला ˛

ग्रंथसंपदा

१) मेरी संसदीय यात्रा (खंड चार)

२) भाषाणाचा संग्रह मृत्यु या हत्या

३) अमर बलिदान

४) कैदी कविराज की कुंडलियाए

५) न्यु डायमेन्शन ऑफ इंडियन फॅारेन पॉलीसी

६) अमर आग हे (१९९४)

अटल बिहारी वाजपेयी यांचे परराष्ट धोरण

अटल बिहारी वाजपेयी यांनी १९९८ - ९९ या काळामध्ये पंतप्रधान म्हणुन काम केले देशाचे उत्कृष्ट नैतृत्व केले याच काळामध्ये १९९८ मध्ये पोखरण मध्ये दुसरी आण्विक चाचणी घेउन जगातल्या निवडक देशात भारताचे आस्तित्व निर्माण केले. आणि ही अण्विक चाचणी पश्चिमात्य देशांना धक्का देणारी ठरली. त्यामुळे पाकिस्तानने अणुचाचणी घेवून इतर देशाच्या तुलनेत आपले सामर्थ्य सिदध करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर आणुचाचणीच्या संदर्भात वातावरण वेगळेच निर्माण झाले. भारताविरोधी आणि समर्थन दोन्ही प्रकारचे मते व्यक्त करण्यात आले. त्यामुळे भारत आणि पाकीस्तान यामध्ये तणाव निर्माण झ ाला आणि हे भारत आणि पाकीस्तान यांच्यातील कटुता कमी करणे , तणाव असणारे संबध पुर्वीसारखे ठेवण्यासाठी १९९९ मध्ये उभय देशामधील बससेवेला सुरुवात करुन गती देण्यात आली भारताच्या या प्रामाणिक पुढाकाराचे जगभरात कौतुक झाले. त्यांच्या शांततेच्या भुमिकेला पुरक असेच हे पाउल होते. भारताने पुढे केलेल्या या मैत्रीच्या हिताला झिडकारत पाकीस्तानने कारागिल मध्ये घुसखोरी करुन घातकी राजकारण केले तेव्हा वाजयेयीच्या नेतृत्वाखाली ऑपरेशन विजय राबवुन चोख प्रत्युत्तर देण्यात आले . भारतीय भुमीवरील हल्ला परतवुन लावण्यात आला त्यामुळे त्याकाळी भारतामधील समाजिक आणि राजकीय, एकीचे प्रदर्शन घडले. जगामध्ये मंदीची लाट असताना वाजपेयीच्या नेतृत्वाखाली १९९८-९९ मध्ये भारताचे देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात जी.डी.पी. ५.८ % वाढ केली. त्यामुळे देशाच्या आर्थकारणाला नविन दिशा मिळण्याचे संकेत मिळाले तसेच ग्रामीण भागात गरीबाच्या विकासासाठी आणि आर्थिक समीकरणासाठी आपल्याला वेगाने प्रगती केली पाहीजे प्रगतीशिवाय आपल्याला तरुनोपाय नाही असे दिशादर्शक विधान वाजपेयी यांनी केले.

एकाविसाव्या शतकात भारताला आर्थिक महासत्ता बनविण्याचे स्वप्न या महान नेत्यानी पाहीले व सरकारी पातळीवर धाडसी निर्णय घेतले ग्रामीण अर्थकारण सक्षम करण्याचे प्रयत्न केले. विकासाची प्रक्रिया आधिक गतीमाण केल्या. सभ्य राजकारणाने विरोधकाना जिंकणारे आदरणीय व्यक्तीत्व म्हणुन अटल बिहारी वाजपेयी कडे पाहीले जाते, देशाचे परराष्ट्र धोरण स्व-रक्षणापासुन ते ग्रामीण भागातील कष्टकऱ्यापर्यंत प्रत्येक बाबतीत रुची असणारे वाजपेयी यांनी बिगर काँग्रस पंतप्रधान या नात्याने आपले अस्तित्व देशाच्या राजकारणात निर्माण केले. आपल्या कर्तव्यावर मुद्रा देशाच्या राजकारणात आपले प्रभाव निर्माण केला. भारत व चिनचे जवळचे संबंध पाकीस्तानचे मैत्रिचे प्रयत्न आणि कारागिलसारखे दुसाहास पाकिस्तानने केल्यानंतर त्याला धुळ चारण्यासही वाजपेयीनी मागे पाहीले नाही.

वाजपेयी यांच्या काळात देशाच्या अर्थकारणाला विकासाला प्रोत्साहन देण्यात आले. खाजगी उद्योगाना प्रोत्साहन देण्यात आले परकीय गुंतवणुकीस वाव, खाजगी उद्योगांना व संशोधनाला प्रोत्साहन देण्यात आले. सरकारच्या अंतर्गत उद्योगाच्या खाजगीकरणाला गती दिली. महामार्गाचे विस्तारीकरण सक्ष्मीकरण वाजपेयीच्या काळात देशाला दिलेली मोठी देणगी आहे.

अमेरिक सोबतचे आंतरराष्ट्रीय संबध सुधारणाचे श्रेय निसंदेह अटलजीकडके जाते. कारागिल युद्धात त्याची प्रचिती आली. पाकीस्तानने आंगळीक करुन भारताला युद्धात ओढायचा प्रयत्न केला असता भारताने आपल्या सिमामध्ये राहुण त्याला चोख उत्तर दिले आपला डाव फसतोय आणि पराभव निश्चीत आहे. हे लक्षात येताच पाकिस्तानने अमेरिकेला युद्धात ओढण्याचा प्रयत्न केला अण्वस्त्र युद्धाची भितिसुद्धा उभी केली. पण अटलजीच्या सरकारणे खंबीरपणा दाखवला शेवटी क्लिंटन प्रशासनाने पाकीस्तानला दम देउन माघार घेण्यास भाग पाडले. अटलजीनी अमृतसर लाहोर अशी ऐतिहासीक बससेवा यात्रा करुन

पाकिस्तानशी संबध सुधारण्यासाठी प्रयत्न लष्करप्रमुख मुशरफ यांनी कारगिलचे कारस्थान रचले तरी परंतु अटलजीने मैत्रीचेच संबध निर्माण केले.

तसेच इस्त्रायलचे राजनैतिक संबंध प्रस्थापित करण्याचे श्रेय पी.व्ही. नससिंह राव यांच्याकडे जात असले तरी भारत इस्त्रायल संबध स्वरक्षण आणि शेतीच्या पलिकडे खऱ्या अर्थाने बहरु लागले ते अटलजीच्या कारकिर्दित सप्टेंबर २००३ मध्ये इस्त्रायलचे पंतप्रधार एरियल शारोन यांनी भारताचा ऐतिहासिक दौरा करुन ५५ वार्षाच्या सुरुवातीला प्रजासत्ताक दिनाला प्रमुख पाहुणे म्हणुन भारताने इस्त्रायलचा कट्अर विरोधक असलेल्या इरानचे अध्यक्ष महमंद खतीना यांना बोलावले होते.

जागतिकीकरणाला सुरुवात होण्यापुर्वी अमेरिकेत भारतीयाची पळपुटे म्हणुन उपेक्षा केली जात त्यामुळे अनिवासी भारतियाच्या मनातही आपल्या मातृभुमीबदल एक अटी निर्माण झाली. त्यामुळे त्यांच्या कर्तत्वाचा आणि क्षमतेचा भारतासाठी फारसा उपयोग होत नव्हता त्याला अटलजीने छेद दिला प्रवासी भारतीय दिवस आणि पुरस्कार या निमित्ताने त्यांनी अनिवासी भारतीयांना तसेच भारतीय वंशाच्या लोकांना त्यांच्या पितृभुमीच्या विकासात सहभागी होण्याची संधी दिली.

वसुधैव कुटुंबकम या व्यापक दृष्टीकोनातील परिणामामध्ये मुख्य म्हणजे राष्ट्रीय हिताचे धोरण राष्ट्रीय एकात्मता आणि राष्ट्रीय सुरक्षिततेच्या तत्वानुसार दृढतेने परराष्ट्र धोरण राबवण्यात येते.

कौटील्य परराष्ट्र धोरणाच्या संदर्भात म्हणतात देशाला आवश्यक असणाऱ्या बाबीची पुर्तता करणे जे आहे ते जतन करणे, जे जतन केले आहे ते वाढवणे व त्यांचा लोकाच्या कल्यानासाठी वापर करणे हे उद्दिष्टे साध्य करण्यासाठी राज्याला सामर्थ्याची गरज भासते.

तसेच कौटिल्य म्हणतात की, इतर राष्ट्राबरोबर मैत्रिपुर्ण संबध सुनिश्चित करण्यासाठी राजकीय सामर्थ हे एकमेव साधन आहे.

पण भारतीय इतिहासात या वाक्याला अपवाद असणारा असा एक नेता होउन गेला ज्याने केवळ संवाद चर्चा आणि वाटाघाटीच्या आधारे जे साध्य कले ते भुतो न भविष्याची अशाच स्वरुपाचे आहे. अटल बिहारी वाजपेयी यांनी सुरुवातीपासुनच परराष्ट्र व्यवहारामध्ये महत्वाचे स्थान आहे वायुवेगाने होतअसलेल्या वैज्ञानिक प्रगती व तांत्रिक सुधारणामुळे संपुर्ण जग एका मध्ये रुपांतरीत झाले.

अशाप्रकारे शेजारी राष्ट्रासोबत शांतता प्रस्थापित करण्याचे प्रयत्न विफल होतअसले तरी चर्चामधुन नेहमी मैत्रीचा हात पुढे केला. विज्ञान आणि तंत्रज्ञानाचे महत्व वेळीच आळखुन परमाणुशक्तीचा प्रयोग यशस्वी करत जय जवाण जय किसान जय विज्ञान हा नारा दिला अशाप्रकारे आंतरराष्ट्रीय पातळीवरील आर्थिक निर्बधातुनही यशस्वीपणे तोडगा काढत भारतीय अर्थव्यवस्थेला छळ बसु दिली नाही. शांततेचा संस्कृतीचा वारसा व भारतीय दृष्टीकोन जगापुढे दाखवण्यात आला आहे.

परराष्ट्र धोरण संकल्पना :

आधुनिक राज्य राष्ट्र संकल्पनेची पाळेमुळे वेगाने रुजुन विविध राष्ट्रीय संबधातुन सुनिश्चित परराष्ट धोरण आखणे महत्वाचेआहे. राष्ट्राचा उदय झाल्यानंतर आंतरीराष्ट्रीय संबधामधुन गुंतागुत अधिकच वाढली संवादात सुसुत्रता वाणण्यासाठी प्रत्येक देशाला साचेबद्ध परराष्ट्र धोरणाची आवश्यकता जास्त तिवृत्तेने जानवु लागली. बहुतांश राष्ट्रांनी एकटेपणा न स्विकारता जास्तीत जास्त राष्ट्रांशी संबंध प्रस्थापीत करण्याचे धोरण स्विकारले आहे. उदा. १९९२ पर्येत भारताच्या परराष्ट्र धोरणाचा महत्वाचा भाग होता. तसेच जगभरातील विषमते

विरुद्धा पारतंत्र्याविरुद्ध लढणाऱ्या राष्ट्रीय आंदोलनामध्ये भारताला मानाचे स्थान प्राप्त झाले होते. त्या त्या राष्ट्रामध्ये ही अंदोलने यशस्वी झाल्यानंतर त्या देशाशी व्यापक संबध प्रस्थापीत करणे किंवा न करणे परराष्ट्र धोरणाचे ध्येय साध्य होते.

परराष्ट्राधोरणाच्या व्याख्या

१)जार्ज मोडेस्की यांच्या मते : परराष्ट्र धोरण म्हणजे समुदायाने किंवा राष्ट्राने दुसऱ्या समुदायाचे किंवा राष्ट्राचे वर्तन प्रभावित करण्यासाठी आणि आंतरराष्ट्रीय पटलावर स्वत:चे स्थान सुरक्षित व मजबुत करण्यासाठी कार्यन्वीत केलेला क्रियाकलाप होय.

२) ह्युज गिब्सन यांच्यामते परराष्ट्र धोरण म्हणजे ज्ञान आणि अनुभवावर आधारित सुरेख व्यापक योजना ज्या आधारे सरकार बाह्य जगताशी व्यवहार करत असते यांचे ध्येय राष्ट्राच्या हिताचे रक्षण आणि जोपासना करणे राष्ट्रहित नमके कशात आहे याची स्पष्ट समाज आणि ते प्राप्त करण्यासाठी किंवा टिकविण्यासाठी आपल्या साधनसंपती व प्रभावाचा कितपत वापर करणे योग्य आहे. याची जाण असणे म्हणजे परराष्ट्रीय धोरण यांच्या शिवाय परराष्ट्र धोरण उभे राहु शकत नाही.(The road to forgain policy pg) या ग्रथांत केली.

अशाप्रकारे राष्ट्रीय ध्येय प्राप्त करण्यासाठी उपलब्ध संसाधनाच्या मदतीने इतर राष्ट्र आपल्या सार्वभौमत्वाचा बाहेरील संस्था व्यक्ती यांच्याशी होणारा क्रियाकलाप निर्धारीत करणारी तत्वप्रणाली म्हणजे राष्ट्राचे परराष्ट्र धोरण होय.

परराष्ट्र धोरणाची स्वरुप : परराष्ट्र धोरणाच्या संदर्भात सांगायचे म्हणजे देशाच्या एकात्मतेचे आणि अखंडतेचे रक्षण करण्याचे काम परराष्ट्र धोरण पार पाडण्याचेकार्य करित असते परराष्ट्र धोरणाद्वारे देशाच्या नागरिकांच्या हिताचे रक्षण करण्यात येते तसेच आपल्या परदेशी नागरीकाचे हिताचे रक्षण करणे आवश्यक असते व्यक्तीच्या सांस्कृतिक मुल्याचे, प्रतिष्ठेचे ,

भावनाचेआणि मान सन्मानाचे रक्षण करण्यासाठी प्रयत्नशिल असणे विविध देशाबरोबर आर्थिक व तंत्रविषयक देवानघेवान करणे आर्थिक आणि तंत्रज्ञानाचा विकास तसेच लष्करी सुसज्जता सामाजिक संरचना राष्ट्रीय सामर्थ्य इंटरनेट आणि वरील सामाजिक माध्यमाचा फैलाव राष्ट्राचे नेतृत्व अशाप्रकारे परराष्ट्र धोरणाचे स्वरुप करता येते.

संशोधन विषय निवडीचे महत्व :

प्रस्तुत संशोधन विषयाच्या निवडण्या मागची भूमिका आणि विषयाचे महत्व स्पष्ट करता असताना काही बाबींची उकल करावी लागते. विशेष म्हणजे स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये भारतीय राजकारण आणि समाजकारण एकाच विशिष्ट विचारधारेच्या अंगाने पूढे गेलेले होते. याच विचारधारेचा प्रभाव भारताच्या राजकारण , समाजकारण , संस्कृती अशा विविध क्षेत्रावर दिर्घकाळ राहिलेला आहे. भारतीय परराष्ट्र धोरण १९५२ ते साधारनत: १९९५ पर्यंत आपवाद १९७७ या दरम्यान काँग्रसची विचारधारा आणि नेतृत्व या माध्यमातुन पुढे गेलेले दिसुन येते. अटल बिहारी वाजपेयी यांनी मात्र आपल्या राजकिय आणि प्रशासकीय कार्यकिर्दीच्या माध्यमातुन भारतीय परराष्ट्र धोरणाला वेगळे वळण दिले असल्याचे जाणवते जवाहरलाल नेहरुच्या नंतर भारतीय राजकारणात आणि अंतरराष्ट्रीय संबधामध्ये आपली एक वेगळी प्रतिमा अटल बिहारी वाजपेयी यांनी निर्माण केल्याचे दिसते. मागच्या काही कालखंडात नेहरु आणि काँग्रेस यांच्या परराष्ट्रीय धोरणाच्या संदर्भाने विविध विद्यापिठामध्ये संशोधन व अभ्यास झालेला दिसतो.परंतु अटल बिहारी वाजपेयी यांचा परराष्ट्र धोरणाच्या अनुषंगाने म्हणावा तेवढा अभ्यास झोलेला नाही म्हणुन प्रस्तुत अभ्यासकाने सदरिल विषयाच्या अनुषंगाने संशोधन करण्याची ठरविले आहे.हेच या विषयाचे महत्व आणि भुमिका आहे.

समस्यासुत्रन

भारतीय परराष्ट्र धोरणाची पायाभरणी भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या कालखंडात झालेली आहे. कोणत्याही सार्वभौम राष्ट्राला आपले परराष्ट्र धोरण स्वतंत्र्य पणे राबवण्याचा आणि ठराविण्याचा पूर्ण अधिकार असतो. भारत जगातील असे एक राष्ट्र आहे जे कि ज्यांने इतर सर्व राष्ट्राचा सार्वभैमत्वाचा आदर राखला आहे. साधारनत: इ.स. १९५२ पासुन ते १९७७ पर्यंत व १९८० ते १९९५ पर्यंत भारतामध्ये काँग्रेस पक्षाची सरकारे होती. परराष्ट्र धोरणासारखा विषय केंद्रसरकारच्या अख्त्यातरित्या येत असल्यामुळे भारताच्या परराष्ट्र धोरणावर काँग्रेस पक्षाच्याच धोरणाचा प्रभाव राहिला आहे. १९७७ ला जनता सरकारच्या माध्यमातुन भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी यांनी स्वतंत्र्य परराष्ट्र धोरण राबवण्याची भूमिका घेतली तदनंतर १९९५ ला एन.डी.ए. सरकारच्या माध्यमातुन वाजपेयी हे पंतप्रधान झाले. आणि त्याही काळामध्ये भारताच्या परराष्ट्र धोरणात वाजपेयी यांचा प्रभाव राहिला आहे. प्रस्तुत अभ्यासकानी वाजपेयीच्या परराष्ट्र धोरणाच्या योगदना संदर्भात प्राथमिक स्वरुपाचा अभ्यास केल्यानंतर काँग्रेस पक्षाच्या सरकारच्या नेतृत्वाखाली परराष्ट्र धोरणा पेक्षा अटल बिहारी वाजपेयीच्या परराष्ट्र धोरणात काय वेगळेपणा आहे ? त्याचबरोबर अटल बिहारी वाजपेयी यांनी परराष्ट्र धोरणात नेमके कोणते योगदान दिलेले आहे ? या संदर्भाने काही समस्या निर्माण झालेल्या आहेत. त्या संबंधाची उकल करण्यासाठी प्रस्तुत संशोधक अभ्यासकाने “अटल बिहारी वाजपेयी यांचे भारताच्या परराष्ट्र धोरणातील योगदान : एक चिकित्सक अभ्यास” हा विषय निवडुन संशोधन करण्याचे निश्चित केले आहे. वरिल समस्यासुत्रणाच्या आधारे प्रस्तुत संशोधक आपले संशोधक कार्य पूर्ण करणार आहे.

उद्दिष्टे :

१) भारताच्या परराष्ट्र धोरणाचा ऐतिहासीक धोरणाचा आढावा घेवुन अभ्यास करणे.

२) अटल बिहारी वाजपेयी यांच्या राजकिय कालखंडाचा अभ्यास करणे.

३) १९९० नंतर भारताच्या परराष्ट्र धोरणात झालेल्या बदलांचा अभ्यास करणे.

४) अटल बिहारी वाजपेयी यांच्या अणुवस्त्राच्या धोरणाचा अभ्यास करणे.

५) अटल बिहारी वाजपेयी यांच्या कालखंड भारत हा इतर राष्ट्रासोबबत मैत्रीपुर्ण संबध प्रस्तापीत करण्यात यशस्वी झाला त्या परिस्थितीचे अध्ययन करणे.

६) अटल बिहारी वाजपेयी यांच्या काळात परराष्ट्रीय धोरण अमेरिकेकडे झुकले याचा आढावा शास्त्रीय पद्दधतीच्या आधारे प्रस्तुत शोध निबंधात घेण्याचे ठरविलेले आहे.

गृहितके :

१) अटल बिहारी वाजपेयी यांच्या पुर्वीचे परराष्ट्र धोरण बचावात्मक व शांतताप्रिय होते.

२) अटल बिहारी वाजपेयी यांचे परराष्ट्र धोरण आक्रमक होते.

३) अटल बिहारी वाजपेय यांच्या कालखंडात भारताचे परराष्ट्र धोरण हे अमेरिकेकडे झ ुकलेले आहे.

४) अटल बिहारी वाजपयी यांनी त्यांच्या कार्यकाळात शेजारिल राष्ट्रासोबत मैत्रीपूर्ण संबध वृद्धीगत होण्यासाठी प्रयत्न केले.

५) भारतातील राजकीय अस्थिरतेच्या काळातही अटल बिहारी वाजपेयी यांनी देशाला स्थिरता प्रदान केली.

संशोधन पद्धती :

संशोधन पद्धती ही एक प्रक्रिया आहे संशोधकाने तटस्थपणे संशोधन समस्येच्या सर्व अंगाचा बारकायीने अभ्यास करुन तथ्य संकलन करणे गरजेचे असते. तथ्य संकलनाच्या प्रक्रियेनंतर संशोधन समस्येची उकल करण्यासाठी आणि निष्कर्षा पर्यंत पोहचण्यसाठी विविध संशोधन पद्धतीचा आधार घ्यावा लागतो. प्रस्तुत संशोधकानी निवडलेल्या विषय हा राज्यशास्त्र या विषया अंतर्गत आसुन स्वातंत्र्य भारताच्या परराष्ट्र धोरणात अटल बिहारी वाजपेयी यांच्या योगदानाच्या संदर्भाने अभ्यास करावयाचा आहे म्हणुन सदरिल संशोधनासाठी विश्लेषणात्मक, वर्णणात्मक या पद्धतीचा अवलंब करण्यात येणार आहे.

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :

परराष्ट्र धोरणाच्या संदर्भात सर्व देशातील सामाजिक, राजकीय तंत्रज्ञानाविषयक स्वातंत्र्यापासुन ते अटल बिहारी वाजपेयी यांच्या परराष्ट्र धोरणाचा आढावा.

तथ्य संकलन पद्धती

प्रस्तुत संशोधनामध्ये द्वितिय तथ्याचा उपयोग करण्यात आला आहे. सार्वजनिक प्रलेख प्रकाशित आणि अप्रकाशत स्त्रोत याचा समावेश करण्यात येईल ऐतिहासिक कागदपत्रे, व्यक्तीगत प्रलेख आत्मचरित्रे, पत्रे, संकेतस्थळ अंतरजाल इत्यादीचा उपयोग करण्यात येईल.

संशोधन आराखडा :

कोणत्याही सामाजिक संशोधनाचा उद्देश असल्याशिवाय संशोधन केले जात नाही. संशोधन आराखड्यामुळे कार्याला सुसंगतपणा आणि व्यवस्थितपणा येतो म्हणजेच संशोधनास

सुरुवात करण्यापुर्वी संशोधनाचा विचार केला जातो. प्रस्तुत संशोधनामध्ये पाच प्रकरणाचा समावेश करण्यात आलेला आहे.

प्रकरण पहिले : प्रस्तावना

प्रस्तुत प्रकरणामध्ये अटल बिहारी वाजपयी यांचे परराष्ट्रीय धोरण व जिवनपरिचय व संशोधनपद्धती याचा समावेश करण्यात येईल.

प्रकरण दुसरे : भारताचे परराष्ट्र धोरण: ऐतिहासिक आढावा

प्रस्तुत संशोधनामध्ये स्वतंत्र्य भारताच्या पराराष्ट्रधोरणाचा पाया स्वांतंत्र्यपुर्व काळातच रचला गेला यांचा उल्लेख करण्यात येईल तसेच पंडीत जवाहरलाल नेहरु यांच्या नेतृत्वाखाली भारताच्या अलिप्तवादी परराष्ट्र धोरणाचा उदय झाला. नेहरुच्या आंतरराष्ट्रयवाद या दोन्ही तत्वानी भारतीय परराष्ट्र धोरणाला मानवतेची व शांततेची दिशा प्राप्त करुन देण्याचा प्रयत्न केला तसेच प्राचिन काळातही या देण्याचा परराष्ट्र धोरण होते. अशाप्रकारे हजारो वर्षाचा प्राचिन ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा लाभलेला आहे प्रस्तुत प्रकरणामध्ये यांचा समावेश करण्यात येईल.

प्रकरण तिसरे : अटल बिहारी वाजपेयी यांचे नेतृत्व व भारताचे परराष्ट्र धोरण

प्रस्तुत प्रकरणामध्ये अटल बिहारी वाजपेय यांच्या नेतृत्वाखाली भारतयी परराष्ट्रीय धोरणाची दिशा बदलली आहे. त्यांच्या काळात २००० साली अमेरिका व भारत यांचा मैत्रिपुर्ण संबंध चिन आणि पाकिस्तानमुळे भारताच्या सुरक्षेसमोर आव्हाने निर्माण झाले होते अशा

परिस्थितीत १९९८ साली अटल बिहारी वाजपेय यांच्या नेतृत्वाखाली धोरणाच्या संदर्भातील माहीतीचे विवेचन व विश्लेषण करण्यात येइल.

प्रकरण चौथे : अटल बिहारी वाजपेयी यांचे परराष्ट्रधोरण : फलनिष्पती

प्रस्तुत प्रकरणामध्ये परराष्ट्रीय धोरणामुळे भारतीय समाजाला मिळालेल्या फलनिष्पती चा समावेश करण्यात आला. अटल बिहारी वाजपेयी यांच्या परराष्ट्र धोरणातील योगदानामुळे भारताच्या परराष्ट्र धोरणाला नवीन दिशा प्राप्त झाली.

प्रकरण पाचवे : निष्कर्ष व शिफारशी

प्रस्तुत प्रकरणामध्ये परराष्ट्रधोरणाच्या संदर्भात अनुसरुन निष्कर्ष व शिफारशी यांचा समावेश करण्यात येईल.

प्रस्तुत संशोधन आराखडा प्राथमिक स्वरुपाचा आहे जसेजसे संशोधन कार्य पुढे जाईल त्यात संभाव्य बदल होवु शकतात.

संदर्भ सुची

१) सौरभ मालविय , राष्ट्रवादी पत्रकारिता के शिखर पुरुष, अटल बिहारी वाजपेयी, वाणी प्रकाशन २०१८.

२) स.राजस्वी , मै अटल बिहारी वाजपयी बोल रहा हुँ , प्रभात पब्लिकेशन २०१६

३) रश्मि, अटल जिवन गाथा, प्रभात पब्लिकेशन २०१८

४) रमेश पोखरीयाल, योगपुरुष अटलजी , डायमंड पब्लिकेशन २०१६

५) उल्लेख एन.पी. , वाजपेयी एक राजनेता के अज्ञात पैलु, मंजुळ पब्लिकेशन हाऊस pvt.ltd २०१८

६) सुरेश चंद्र , सर्वप्रिय अटलजी , पवन आग्रवाल पब्लिकेशन २०१८

७) ना.मा.घटोर , मेरी संसदीय यात्रा , प्रभात प्रकाशन २०१५

८) ना.मा.घटोर , अटल बिहारी वाजपयी संकल्पकाल , प्रभात प्रकाशन २०१२

९) सिंह गहलौत , भारतीय विदेश निती , अर्जुन पब्लिसिग हाऊस २००६

१०) पाटील वा.भा. आंतरराष्ट्रीय संबध प्रशांत पब्लिकेशन्स जळगाव २०११

११)देवळाणकर,शैलेंद्र भारतीय परराष्ट्र धोरण प्रतिमा प्रकाशन पुणे २००७

१२) खन्ना,बी.एन. व अरोडा लिपाक्षी, भारत की विदेशानिती,विकुस पब्लिसिंग हाऊस दिल्ली २००२

१३) दिवाण चंद्रशेखर भारताची विदेश निती, विद्या प्रकाशन नागपुर १९९२

१४) देशपांडे श्रीकांत व इंद्रपवार दि,वा, आंतरराष्ट्रीय संघटना मंगेश प्रकाशन नागपुर १९९४

१५)	नाइकवाडे अशोक भारताचे परराष्ट्रीय धोरण स्टडी सर्कल पब्लिकेशन मुंबई १९९४

१६)	प्रदिप आगलावे, संशोधन पद्धती शास्त्र व तंत्रे २०००

१७)	सुधाकर कुलकर्णी, आंतरराष्ट्रीय संबंध सिद्धांत आणि राजकारण अरुणा प्रकाशन २००५

१८)	विजय त्रिवेदी, हार नही मानुँगा हार्पर कॉलीन्स पब्लिकेशन इंडिया २०१७ .

१९)	Htpp://openthemagzine.com/columns/mororaji-desai-outwitted-jagjjarun-run-charansinh/

२०)	The Indian EXPRESS

२१)	https:/www.livemint.com/Home-page/WKUMCJFt-७१XQ८UCDZGRL/how-vajpayee-fared-in-the-१४-loksabha-election-he-conteste-html.

२२)	India today - BJP gold gamble may ३१-१९९६

२३) India today - Indian is now a nuclear

२४)	http://openthe magazine.com/columns/column//indruprashta-४७/

२५) Shakti sinha, the year that changed india VAJAPAYEE vintage book २०२०

२६) jahak rajatai, pokhran II the explasion that rocked the world, Regency publication २००२

२७) kingshuk nag, ATAL BHIHARI VAJAPAYEE A man for all seassans , rupa publication २०१५

२८) jitendra mishra pokharna Ii and beyond bibilioschool , publication २०१२

२९)vinay saitapati, jugalbandi the BJP before modi, penguin viking २०२०

संशोधक

जाधव विश्वजीत हणमंतराव

एम. ए. बी.एड. सेट (राज्यशास्त्र)

मार्गदर्शक

Dr. P. D. Suryawanshi

डॉ. पी.डी.सूर्यवंशी

S. S. Suryabhanji Pawar College,

प्राध्यापक,राज्यशास्त्र विभागप्रमुख

स्वा.सै.सूर्यभानजी पवार महाविद्यालय

पुर्णा (जं.), जि. परभणी